# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

जा.क्र./मऔविम/मुनि/ P379906 /२०२५ दिनांक :- 02/01/25

## परिपत्रक

**विषय :- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील नाजकधा कलम २० खाली औद्योगिक प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या जमिनींच्या हस्तांतरणाबाबत.**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. नाजक २०१८/प्र.क्र.५१/भाग-II/नाजकधा -१, दि. २३.०६.२०२१.
२. शासन निर्णय क्र. नाजक २०२३/प्र.क्र.११९/ नाजकधा, दि. १५.०३.२०२४.
३. शासन निर्णय क्र. नाजक २०२३/प्र.क्र.११९/ नाजकधा, दि. २६.०६.२०२४.

नाजकधा कलम २० खाली औद्योगिक प्रयोजनार्थसूट देण्यात आलेल्या जमिनीच्या हस्तांतरणासाठी नाजकधा अंतर्गत (ULC) हस्तांतरण शुल्क आकारण्याबाबत शासनाने वेळोवेळी शासन निर्णय दि. १०.०४.१९९७, दि. २३.११.२००७, दि. ०१.०८.२०१९ व दि.२३.०६.२०२१ आणि दि. १५/०३/२०२४ अन्वये धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत. दि. १५/०३/२०२४ चे शासन निर्णयानूसार दि. २३.०६.२०२१ पूर्वीचे हस्तांतरणाकरीता ULC शुल्क आकारले नसल्यास दि. २३/०६/२०२१ पूर्वीचे हस्तांतरणापैकी शेवटच्या हस्तांतरणासाठी ULC शुल्क व्याजासह आकारण्याची तरतुद आहे.

वरील शासन निर्णयामध्ये औद्योगिक प्रयोजनार्थ कलम २० अन्वये सुट देण्यात आलेल्या जमिनीबाबत होणारे अधिमुल्यापैकी ६०% रक्कम शासनास हस्तांतरण आणि ४०% रक्कम महामंडळाच्या लेखाशिर्षा मध्ये जमा करण्यात येईल अशी तरतुद असून या करीता मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

वरील प्रमाणे शासनाने नाजकधा अंतर्गत दि. २३.०६.२०२१ पूर्वीचे हस्तांतरणाकरीता आकारावयाची हस्तांतरण शुल्काची रक्कम व व्याज याबाबत परिगणीत केलेली अनेक प्रकरणे महामंडळाकडे प्राप्त होत आहेत सदर प्रकरणांचा विहित वेळेत निपटारा करण्याचे दृष्टीने ULC हस्तांतरण शुल्क वसूल करण्याचे अधिकार संबंधित सह. मु.का.अ. यांना प्रदान करण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी उपरोक्त कार्यपद्धतीची नोंद घेवून त्यानूसार कार्यवाही करण्यात यावी.

02/01/25

(पी. वेलरासू, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई.

प्रत माहितीसाठी:-

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम.
२. सर्व अधिक्षक अभियंता / वरीष्ठ नगर रचनाकार, मऔविम.
३. सर्व कार्यकारी अभियंता/ प्रादेशिक अधिकारी/ सहयोगी रचनाकार, मऔविम.
४. सर्व उप अभियंता/ उपरचनाकार/ वि.नि.प्रा. मऔविम.
५. कार्यालयीन आदेश धारिका/सुरक्षित धारिका.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in